**L. A. BILL No. XX OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २०.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६६ चा १० महा. ३७. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २०२३ चा महा. अध्या. ३. १९ जून २०२३ रोजी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०२३, हा प्रख्यापित केला होता ;

(शा.म.मु.) एचबी ९२३-१ (४४०-७-२०२३)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १९ जून २०२३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३० ची सुधारणा.

१९६६ चा महा. ३७.

**२.** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (१) च्या परंतुकातील खंड (दोन) मधील, " महानगरपालिकांच्या बाबतीत " या मजकुराऐवजी, " महानगरपालिकेच्या किंवा, यथास्थिति, नियोजन प्राधिकरणाच्या बाबतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२३ चा महा. अध्या. ३.

**३.** (१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०२३, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) या अन्वये स्थापन केलेल्या प्रदेशांमधील जमिनींचा विकास व वापर करण्याचे नियोजन करण्यासाठी हा अधिनियम अधिनियमित केला आहे. नगर नियोजनाच्या योजना योग्य रीतीने केल्या आहेत आणि त्यांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यात येत आहे याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने विकास योजनेचा उद्देश घोषित करण्यासाठी, ती तयार करण्यासाठी, सादर करण्यासाठी व तिला मंजुरी देण्यासाठी अनुपालन करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाच्या प्रकरण तीनमध्ये तरतूद केली आहे.

२. उक्त अधिनियमामध्ये सर्व नियोजन प्रक्रियेसाठी एका कालबद्ध कार्यक्रमाची तरतूद केली आहे आणि जर, नियोजन प्राधिकरण, विनिर्दिष्ट कालावधीत नियोजन करण्यात निष्फळ ठरले तर, नियोजनाची संपूर्ण प्रक्रिया, व्यपगत होते.

३. उक्त अधिनियमाच्या कलम ३० मध्ये अशी तरतूद आहे की, प्रत्येक नियोजन प्राधिकरण, विकास योजना तयार केल्यासंबंधी कलम २६ अन्वये शासकीय **राजपत्रामध्ये** नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत विकास योजनेचा मसुदा मंजुरीसाठी राज्य शासनास सादर करील. उक्त कलम ३० च्या परंतुकामध्ये अशी तरतूद आहे की, असा कालावधी, एक कोटी किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या महानगरपालिकेच्या बाबतीत, एकूण चोवीस महिन्यांपर्यंत आणि दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, एक कोटीपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या महानगरपालिकेच्या बाबतीत, एकूण बारा महिन्यांपर्यंत वाढविता येईल.

४. असे निदर्शनास आले होते की, दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, एक कोटीपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या नियोजन प्राधिकरणांना, उक्त कलम ३० च्या पोट-कलम (१) च्या परंतुकाच्या खंड (तीन) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, सहा महिन्यांच्या वाढीव कालावधीत विकास योजनेचा मसुदा मंजुरीकरिता राज्य शासनाकडे सादर करणे अडचणीचे ठरत होते आणि अशी शक्यता होती की, प्रकरण तीन अन्वये विकास योजनेचा मसुदा तयार करण्याची व मंजूर करण्याची प्रक्रिया अल्प कालावधीमुळे व्यपगत झाली असती आणि अंतिमतः, यामुळे अशा नियोजन प्राधिकरणांच्या अधिकार क्षेत्रातील क्षेत्रांच्या विकास प्रक्रियेवर परिणाम झाला असता.

म्हणून, उक्त अधिनियमाच्या प्रकरण तीन अन्वये वेळेत प्रक्रिया पूर्ण करता यावी म्हणून, नियोजन प्राधिकरणाने राज्य शासनाकडे विकास योजनेचा मसुदा सादर करण्याचा कालावधी, दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, एक कोटीपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या महानगरपालिकेस लागू असल्याप्रमाणे, सहा महिन्यांवरून एकूण बारा महिन्यांपर्यंत वाढविणे आवश्यक होते. म्हणून, राज्य शासनास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ३० मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटले.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक १९ जून २०२३ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०२३ (२०२३ चा महा. अध्या.३), हा प्रख्यापित केला होता.

६. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १३ जुलै, २०२३.

**उदय सामंत,**
नगरविकास मंत्री.

## सन २०२३ चे वि.स.वि. क्र. २०. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट

### (महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यातील उतारे)

### (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७)

**१.** ते **२९.** ** ** **

**३०.** (१) नियोजन प्राधिकरण किंवा, यथास्थिति, उक्त अधिकारी कलम २६ अन्वये अशी योजना, तयार केली असल्याबद्दलची नोटीस **राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या या कालावधीत, कमल २८ च्या पोट-कलम (४) अन्वये विकास योजनेच्या मसुद्यात करण्यात आलेल्या फेरबदलांच्या किंवा बदलांच्या सूचीसह, विकास योजनेचा मसुदा मंजुरीसाठी राज्य शासनास सादर करील. विकास योजनेचा मसुदा सादर करणे.

"परंतु, राज्य शासनास, नियोजन प्राधिकरणाच्या किंवा उक्त अधिकाऱ्याच्या अर्जावरून लेखी आदेशाद्वारे, आणि त्या आदेशात लेखी नमूद करण्यात येईल अशा पुरेशा कारणास्तव, उक्त कालावधी त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा आणखी कालावधीसाठी, वेळोवेळी, वाढविता येईल, परंतु तो कालावधी कोणत्याही परिस्थितीत,—

(एक) अलिकडच्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार, एक कोटी किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांच्या बाबतीत, एकूण चोवीस महिने ;

(दोन) अलिकडच्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार, दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक, परंतु एक कोटीपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांच्या बाबतीत, एकूण बारा महिने ; आणि

(तीन) इतर कोणत्याही बाबतीत, एकूण सहा महिने,

यांपेक्षा अधिक असणार नाही.".

(२) ** ** **

**३१.** ते **१६५.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २०. ]**

**[ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. उदय सामंत,**
नगरविकास मंत्री. **]**

**[विधानसभेने दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.